म. ... ठाणें
विषय
सं. क्र. ९८७८
REFBK-0001457
REFBK-0001457

१८१८

ना.

आ. के.

# तिकुडचें पहिलें पत्र.

[अगबाई! कविताबद्ध कां आहे?
तर मग वाच तरी!]

'सासरची पाठवणी', 'माहेरचें मूळ'
इत्यादि पुस्तकांचे कर्ते
"महाराष्ट्रभाषाचित्रमयूर"
रा. रा. कृष्णाजी नारायण आठल्ये,
एडिटर—'केरळकोकिळ'
ह्यांनीं केलें तें

रा. रा. लक्ष्मण नारायण गोडबोले,
मॅनेजर, डी. एस्. कंपनी, बुकसेलर व पब्लिशर, बुधवार पेठ, पुणें.
ह्यांनीं लोकोपयोगार्थ छापून प्रसिद्ध केलें.

मुद्रक—केशव रावजी गोंधळेकर,
'जगद्धितेच्छु प्रेस', ४३२ शनवार पेठ, पुणें.

नोव्हेंबर सन १९१७ इसवी.

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. नं. ३६८
ता.
ठाणे

REFBK-0001457
REFBK-0001457

मराठी ग्रंथ
५६५४

सर्व हक्क प्रकाशकांचे स्वाधीन.

# प्रस्तावना.

स्त्रियांकरितां कविताबद्ध कांहीं बोधपर पुस्तकें लिहावींत हीं प्रथम कल्पना मनांत येऊन '**सासरची पाठवणी**' हें पुस्तक मूळ '**केरळकोकिळ**' मासिक पुस्तकांतून छापण्याकरितां तयार केलें. आमचे परम मित्र कै० जनार्दन महादेव गुर्जर, मुंबई येथील प्रसिद्ध बुकसेलर, हे त्यावेळीं 'केरळकोकिळचे' प्रोप्रायटर होते. त्यांना ही मूळ प्रत वाचून पहावयास सवड झाली नव्हती. म्हणून त्यांनीं त्यांचीं प्रुफें खिशांत घालून ते गडबडीनें कोंकणच्या बोटींत जाऊन बसले व बोट चालू झाल्यावर रिकामपणीं तीं 'सासरच्या पाठवणी'चीं प्रुफें वाचून पाहिलीं. तेव्हां ती कविता पाहून त्यांचें मन इतकें प्रसन्न झालें कीं, त्यांनीं त्याचवेळीं पेन्सलीनें तेथूनच आम्हांला एक पत्र लिहिलें आणि त्यांत असें म्हटलें आहे कीं, "काय हो करूं ? मी गरीब पडलों. हाच जर मी श्रीमान् असतों तर ह्याच सासरच्या पाठवणीला एक गांव आपणांस इनाम करून दिला असता. खरोखर तिची योग्यताच तितकी आहे. तथापि व्यापारीदृष्टीनें जितका अधिक मोबदला मला देणें शक्य आहे तेवढा मी आपणांस मोठ्या आनंदानें देईन." रा. गुर्जर हे मोठे रसिक व मार्मिक गृहस्थ होते. तेव्हां त्यांचा हा आभिप्राय गांव इनाम देण्यापेक्षांही अधिक योग्यतेचा आहे व त्यांच्या मंगल आशीर्वादाप्रमाणें तिचा खपही पण जारीनें होत आहे.

तसेंच कै० गणेश नारायण जोशी 'विजय' प्रेसचे मालक ह्यांनींही 'सासरच्या पाठवणीच्या' धर्तीवर दुसरें पुस्तक करून मागितलें. तें तयार करून त्यास दिल्यानंतर त्यांनीं वाचून पाहिल्यावर असे उद्गार काढले कीं, "आमची व आमच्या मित्रमंडळींची अशी ठाम समजूत होती कीं, आपल्याला सासरच्या पाठवणीसारख्या कविता पुनरपि साधावयाच्याच नाहींत. फार तर काय, पण 'सासरच्या पाठवणी' इतकें गोड व प्रेमळ नांव सुद्धां सुचणार नाहीं. कारण हा वेळ आहे. एखाद्या वेळीं एखादी गोष्ट साधून जाते. तशीच गोष्ट त्याच गृहस्थानें करूं म्हटलें तरी ती पुनः साधत नाहीं. परंतु आपलें '**माहेरचें मूळ**' पाहून ती आमची कल्पना सर्वस्वी चुकीची ठरली. 'माहेरचें मूळ' हें नांव व आंतील विषय इतका प्रेमळ, मधुर व कोमल वठला आहे कीं त्यापुढें सासरची पाठवणी खरोखर फिकी वाटते. आपल्या गुणाचा मोबदला देण्यास कोण समर्थ आहे ?" असें म्हणून त्यांनीं ठरावापेक्षां अधिक पांच रुपये दिले. त्यानंतर 'दंपत्यसुखाचा आनामा' झाला. त्यांतील कितीएक पद्यें एका थोर व मातृभक्त गृहस्थांस अत्यंत प्रिय व रमणीय वाटतात. नंतर रा. रा. फडनीस बुकसेलर ह्यांच्या सूचनेवरून त्यांसही '**मुलीचा समाचार**' हें पुस्तक करून दिलें. ह्या चारही पुस्तकांतील पद्यें ज्या मुलींच्या शाळांत

चालत नाहींत अशी शाळा नाहीं, व जिला एकही ह्यांतील पद्य येत नाहीं अशी मुलगीही पण सहसा आढळणार नाहीं. इतकीं हीं पद्यें लोकप्रिय झालेलीं आहेत. मुंबईमध्यें एक गुजराथी मनुष्य तर हीं चारच पुस्तकें विकून आपला निर्वाह चालवितो. दुपारच्या वेळीं मुंबईतील प्रत्येक चाळींतून ह्याची आरोळी कानीं पडतांना बहुतेकांनीं ऐकलेंच असेल. असो.

वरच्या चार पुस्तकांच्या जोडीला आजचें हें **'तिकुडचें पहिलें पत्र'** तयार झालें आहे. परंतु वरच्या पाहिल्या चार पुस्तकांतील विषय व ह्या आजच्या पांचव्या पुस्तकांतील विषय मात्र फार भिन्न आहे. पहिल्यांतील विषय, लग्न, गृहस्थिति, व सासरची वागणूक इत्यादि गृहस्थाश्रमांतीलच होता. परंतु ह्या पुस्तकांतील विषय परदेशच्या स्थितीसंबंधाचा आहे. तेव्हां तो लोकांस कसा काय पसंत पडतो पहावें. ह्यांत एक तरुण गृहस्थ आपल्या प्रियपत्नीला येथेंच ठेवून सांप्रत चालुं असलेल्या युद्धाच्या मोहिमेवर गेला असल्याचें काल्पिलें आहे. तेव्हां त्याची पत्नीही तिकडील ऐकलेलीं संकटें, तिकडील रीतिरिवाज, अडचणी ज्या ज्या तिच्या ऐकिवांत होत्या त्या त्या आठवून ती विलाप करीत आहे व पति आपलें युद्धाचें काम सांभाळून फावल्या वेळांत तिकडील परास्थिति पाहून तिकडेही पुष्कळ गोष्टी घेण्यासारख्या व मनुष्याच्या उन्नतीस कारणीभूत होण्यासारख्या आहेत व त्या देशाविषयीं आमच्या ज्या ऐकिव कल्पना आहेत त्या केवळ भ्रामक आहेत; हा विषय पहिल्या या पत्रांत गोंवला आहे. हा सर्व लोकांस पसंत पडला तर दुसऱ्या पत्रांतही अनुक्रमानेंच तिकडील अनेक गोष्टींचा उलगडा होऊन त्या देशाविषयीं आपल्या स्त्रियांस बरेंच ज्ञान होईल अशी अशा आहे. विषय थोडासा भिन्न असल्यामुळें समजुतीकरतां ठिकठिकाणीं टीपा दिल्या आहेत. हा विषयही आमच्या सर्व भगिनीवर्गास प्रिय होवो.

पुणें,<br>
१ नोवेंबर १९१७.

ग्रन्थकर्ता.

# तिकुडचें पहिलें पत्र.

## कविता.

श्लोक [ मंदाक्रांता. ]

देवा देवा! कुठुनि तरि तूं आणिशी ही लढाई !।
जाती सारे हुरळुनि तिची ऐकुनीया बढाई ॥
" शस्त्रें वस्त्रें सकल मिळुनी मोठमोठे पगार।
दर्या माजी सुखकर हवा बर्फही थंडगार " ॥ १ ॥
" लोकीं होते प्रगट सहजीं आपुली राजनिष्ठा।
शूरांमाजी करिति गणना देउनीया प्रतिष्ठा ॥
धैर्यें शौर्यें चढुनि बळ तत्तेज अंगीं विराजे।
योद्धे सारे स्तवन करुनी मान देतात राजे " ॥ २ ॥
" भालीं दैवें मरण लिहितां कोण कोठें पळेल।
अंतःसद्मीं लपुनि बसुनी सांग कां तें टळेल ?॥
धारातीर्थीं पतन घडतां कोणता सांग तोटा।
स्वर्गश्रीही मिळुनि घडतो कीर्तिचा लाभ मोठा ॥ ३ ॥
" ऐशीं स्वर्गासम बहु फळें दाटलीं एक जागीं।
त्यांतें हातें ढकलिल बळें तोच लोकीं अभागी ॥
मी तों मागें समजुनि असें काय घेईन पाय।
भाग्यें हातीं सहज पडला सौख्यदाता उपाय "॥ ४ ॥
" ऐशी संधी नवस करुनी काय येई फिरून।
जाणोनी दे अनुमति मला धैर्य चित्तीं धरून ॥ "
ऐशी माझी करुनि समजी हाय गेलांत नाथा।
मी तों येथें झुरत पडलें कोण वाली अनाथा ॥ ५ ॥

श्लोक [ पृथ्वीवृत्त ]

विलायत कुठें कुठें शहर भव्य तें लंदनें ।
अहर्निश जलामधें पळति अग्निचें स्यंदन ॥
दिसे भरुनि राहिला दशदिशा महासागर ।
तुफान उठतां गमे निवळ मृत्युचें आगर ॥ ६ ॥

पडे झुकुनि बोटही घडिघडीस बाजूवरी ।
धका बसुनि माणसें सकल कावरीं बावरीं ॥
धडाधड उडोनिया पडति एकमेकावरी ।
सुटोनि कर लोळती कवण तैं कुणा सावरी ॥ ७ ॥

श्लोक [ मंदाक्रांता. ]

रों रों रों रों करुनि गगनीं वाहतो काय वारा ।
हा हा हा हा क्षणभरि नसे तेथ कोणा निवारा ॥
बोटीमाजी शिरुनि जल हीं कैक लोंढे वहाती ।
डांबा खांबा धरुनि जन तैं संकटानें रहाती ॥ ८ ॥

धुंदी येते पसरुनि धुकें कोठचें सूर्यबिंब ।
वस्त्रें पात्रें भिजुनि भिजुनी होतसें सर्व चिंब ॥
चित्तीं चिंता प्रबळ न कळे सांज किंवा सकाळ ।
ग्रासायाला खवळुनि जणों पातला काय काळ ॥ ९ ॥

श्लोक [ शार्दूलविक्रीडित. ]

ओली होउनियां किती सुरकुते अंगावरी कातडी ।
पित्तें मस्तकही फिरूनि तुटती ओकोनिया आंतडीं ॥

---

१ इंग्लंददेश, लंदन, किंवा युरोपांतील कोणत्याही ठिकाणचा प्रवास करणें ह्याला अज्ञलोक साधारणपणें ‘ विलायत ’ असेंच म्हणतात. २ ही इंग्लंद देशाची राजधानी प्रसिद्धच आहे. ३ ‘ अग्नीचे स्यंदन ’ म्हणजे अग्नीचे रथ—येथें जलामध्यें कितीएक अग्नीचे रथ फिरत असतात ह्याचा लाक्षणिक अर्थ आगबोटी असा घेतला आहे.

ऐशी संकटमालिका घडिघडी उत्पन्न होते नवी ।
वर्णायास्तव ती यथास्थित बरी मी काय आहे कवी ? ॥१०॥
येते भोंवळ मस्तकांत न सुचे कांहींच खाणें पिणें ।
वाटे ओढुनि घेतलें व्यसन मी देवा ! नको हें जिणें ॥
कोठें सुंदर बालकें चिमुकलीं कोठें प्रिया लाडकी ।
हा हा मृत्यु गमे क्षणक्षण मला येतो तया आड कीं ॥ ११॥
तोंडें वासुनि नक्र वक्र गतिनें ग्रासावया धावती ।
मासे पर्वतसे अनेक जवळी येवोनिया पावती ॥
ऐशीं क्रूर न दूर तीं चलचरें पाहोनि वाटे भय ।
मार्गामाजि असे प्रसंग पडती सारेच ते दुर्जय ॥ १२ ॥
पक्ष्याच्याच समान मत्स्य उडुनी दिग्मंडळी राहती ।
शुंडा उंच करोनि तंतु टपुनी वेढावया पाहती ॥
मेघीं वीज कडाडुनी चमकते गर्जोनि केव्हां नभीं ।
काळाची जणुं ही ससज्ज सगळी सेनाच राहे उभी ॥१३॥

श्लोक [मंदाक्रांता.]

टार्पेडोचा तुम्हिच म्हणतां केवढा हो अघातें ।
मोठ्या बोटी फुटुनि तुटुनी होतसे फार घात ॥
एकाएकीं बसुनि अचका सर्व अस्तास जातें ।
डोळ्याचेंही अवसर नसे हालवायास पातें ॥ १४ ॥

---

१ विलायतेस जाणारी आगबोट एडन बंदर सोडून तांबड्या समुद्रांत शिरली कीं हें पंखांचे मासे दृष्टीस पडतात. ह्या माशांना पक्ष्याप्रमाणें पंख असून ते खुशाल येऊन आगबोटींच्या डोलकाठ्यावर बसतात ! करसनदास मूलजीकृत विलायतचा प्रवास इत्यादि वर्णनें वाचावींत, म्हणजे ही गोष्ट ध्यानांत येईल. २ तंतू ह्या नांवाचा एक भयंकर प्राणी समुद्रांत कधीं कधीं आढळतो. ह्याला हत्तीसारख्या मोठमोठ्या आठ सोंडा असून त्यानें तो आगबोटीला सुद्धां वेढा घालतो. असा एक भयंकर तंतू भूमध्यसमुद्रांत प्राचीनकालीं असल्याचा दाखला आढळतो. केरळकोकिळ वर्ष ५ अंक ३ पहावा. ३ टार्पेडो म्हणजे पाणसुरुंग. हे ह्या हल्लींच्या युरोपांतील महायुद्धापासून सर्वांस जगजाहीर झालेच आहेत. ह्याचा धक्का फार भयंकर असतो. ४ धक्का. ५ हबका. धक्का.

श्लोक [ मालिनी. ]

धड धड धड छाती होतसे सर्व काल ।
पळ न कळत केव्हां क्षुब्ध होईल काल ॥
निशिदिनिं सकलांना शत्रुचा धाक वाटे ।
स्मरुनि सकल माझा भीतिनें कंठ दाटे ॥ १५॥

श्लोक [ इंद्रवज्रा. ]

मार्गांत ऐशी उडते दशा ही ।
गेल्यास तेथें अपुलें न कांहीं ॥
भाषाहि नाहीं परकीय अन्न ।
पाणी हवा सर्वच भिन्न भिन्न ॥ १६ ॥

श्लोक [ भुजंगप्रयात. ]

दिसें साजरें सर्व तेथें दुरून ।
मिळेना परी चांगलें स्वच्छ ऊन[1] ॥
वरोनी सदा कोसळे वर्फराशी ।
दहादां पडे शीघ्र येतां घराशीं ॥ १७ ॥

श्लोक [ इंद्रवज्रा. ]

तांदूळ डाळ सर्वदाहि[2] मिळे न नीट ।
मार्षान्न[3] पाहुनि सदोदित येत वीट[4] ॥
पक्वान्न वाढिति निरंतर एक एकें[5] ।
ऐशा विपत्ति कथितां माथितां[6] अनेक ॥ १८ ॥

श्लोक [ शार्दूलविक्रीडित. ]

आंबे नारळ केळ एक न मिळे भक्षावयाला कदा ।
गोवारी उकडून[7] येत पुढती किंवा बटाटे सदा ॥

---

१ लंदनमध्यें स्वच्छ ऊन फारसें कधीं पडत नाहीं. नेहमीं वांबाळ बर्फ व थंडी असते. २ हिंग, जिरें, मिरें, इत्यादि आपला मसाला. ३ मांसान्न. ४ तिटकारा, शिसारी. ५ युरोपियन पद्धतींत एक एक ताट एक एकदां येतें. भात आला म्हणजे भातच यावयाचा, व भाजी आली म्हणजे भाजींच यावयाची अशी वाढण्याची वहिवाट आहे. ६ एकत्र करून. ७ तिकडे कोणत्याही भाजींत शिजतांना तिखट, मीठ, मसाला वगैरे मुळींच घालीत नाहींत. फक्त भाजी उकडून आणून पुढें ठेवितात. तीस शेजारीं मीठ, मिरपूड, वगैरे मसाला बाटल्यांत भरलेला असतो तो लावून ती भाजी खावी.

लावावी मिरपूड मीठ वरती ऐशी जनांची रिती ।
होती येउन हाल ज्या अडचणी त्या आज सांगूं किती ॥१९॥
तैनातीस जिथें चुकूनि तुमच्या स्वप्नांत नाहीं गडी ।
घंटा वाजवितां सदैव तरुणी येते पुढें तांतडी ॥
दावी ती मग बॉलें[2] हॉलें[3] गमती होतात ज्या ज्या नव्या ! ।
किंवा सुंदर वस्तुही पुरविती ज्या ज्या तुम्हाला हव्या ॥२०॥

श्लोक [ मंदाक्रांता. ]

खर्चे पैसा हरघडि तिथें काय पाण्यापरीस ।
सारें तेथें विकत मिळतें फक्त नाहीं परीसें[4] ॥
जेथें तेथें प्रगट दिसतो एक उद्योग मात्र ।
त्याची सेवा करिल जन जो तोच सौख्यास पात्र ॥ २१ ॥
जाळायाला कधिंच न मिळे एक लांकूड कोठें ।
जेथें तेथें पडति दगडी कोळसे मोठमोठे ॥
त्यांचा आहे म्हणति सगळे धूर[5] मोठा विषारी ।
कंठामाजी सुजुनि धमन्या रोग होतात भारी ॥ २२ ॥

श्लोक [ शार्दूलविक्रीडित. ]

जाडा ओव्हरकोट[6] शर्ट[7] किति तें ओझें शरीरावरी ।
खासा ऊलन[8] सूट[9] बूट चढवा थंडी निघेना तरी ॥
सोसेना म्हणती किती जन हवा गोमांसमद्याविणें ।
त्याला स्वर्ग म्हणोनि जे विहरती धिग् धिग् तयांचें जिणें २३

श्लोक [ भुजंगप्रयात. ]

असो सर्व हें जुंपलें घोर युद्ध ।
जनाला गमे मृत्युचें तोंड शुद्ध ॥

---

१ तेथें चाकर नोकर पुरुष नसतात. त्यांच्याऐवजीं मोलकरणी असतात. २ नाच. ३ रंगभूमी. ४ लोखंडास लावला असतां सुवर्ण करणारा कल्पित पाषाण. ५ दगडी कोळशाचा धूर फार विषारी असतो व तो घशांत शिरला असतां घटसर्पादि रोग होतात.—डॉ० आनंदीबाई जोशी ह्यांचें चरित्र पहा. ६ वरचा मोठा झोळदार झगा. ७ आंतील सदरा. ८ लोकरीचा. ९ पोषाख.

कशी जाळिते नित्य चिंता मना ही
कसें काय होईल हा नेम नाहीं ॥ २४ ॥

श्लोक [ मंदाक्रांता. ]

पत्राची तों सतत तुमच्या लागते कोण आस ।
पोंचायाला मजशिं परि तें लागती मासमासें[1] ॥
पाहोनीया लिखितें[2] तुमचें होय आनंदपर्व ।
ऐकोनीया कुशल गमतें पावलें आज सर्व ॥ २५ ॥

श्लोक [ शिखरिणी. ]

करोनी नाथा मी स्मरण तुमचें नित्य झुरत ।
यशस्वी होवोनी कधिं तरि बरें याल परत ॥
जयश्रीनें युक्त त्वरित तुमचें दर्शन घडो ।
मुखीं सर्वत्रांच्या नरहरिकृपें साखर पडो ॥ २६ ॥

श्लोक [ मंदाक्रांता. [

केव्हां नाथा ! मधुर तुमचें पत्र फोडीन हातें ।
मार्गीं वेड्यासम नयन मी लावुनीया पहातें ॥
जातां येतां हळु हळु उठे चालता शब्द पायीं ।
वाटे आला जणुं लगबगा डाकवाला शिपायी ॥ २७ ॥
नाहीं कोणी म्हणुनि बसते खिन्न होवोनि चित्तीं ।
चिंताक्रांत भ्रमुनि मनही होतसे शून्य वृत्ती ॥
घाई घाई अवचित बरा तोंच आला शिपायी ।
घ्या घ्या घ्या घ्या ह्मणत तुमचें पत्र हें अंबुताई ॥ २८ ॥
आनंदाची लहर उसळे वाढला सौख्यसिंधू ।
एकाएकीं नयन भरले दाटुनी अश्रुबिंदू ॥
उत्कंठेनें भ्रम सकलही तत्क्षणीं दूर गेला ।
वाचायाला हळु हळु तिनें पत्र आरंभ केला ॥ २९ ॥

---

१ महिनेच्या महिने. २ पत्र, लेख.

श्लोक [ पृथ्वीवृत्त. ]

“ अमूल्य गुण हे सखे! तव पुनः पुन्हां आठवी ।
ह्मणोनि करुनी कृपा त्वरित उत्तरा पाठवी ॥
कसोनि [1]कटि सिद्ध मी सतत युद्ध[2]उत्क्रांतिला ।
परंतु तव पत्र हें सदन एक विश्रांतिला ॥ ३० ॥

श्लोक [ शार्दूलविक्रीडित ]

सूं सूं सूं करुनी शिरावरुनिया जातात गोळ्या किती ।
तोफांचा भडिमार फार भिववी त्याची न वाटे क्षिती[3] ॥
गोळा लागुन हात पाय तुटतो त्याचीहि झाली सवे[4] ।
जाळीतो सखये तुझा विरह जो मातें न तो सोसवे ॥३१॥

श्लोक [ स्रग्धरा. ]

टाकीतों अग्निमाजी सरसरुनि उड्या झाडितों स्वैर[5] फेर[6] ।
मृत्यूला कोण लेखी धरुनि जळतसों शत्रुशीं नित्य वैर ॥
आशेचें दर्शनाच्या तव बळ सखये! देत उत्तेजनाला ।
त्याच्यायोगें तुझ्या या वरि वरि समरीं! येत फत्ते जनाला[7]॥

श्लोक [ द्रुतविलंबित. ]

यश किती मिळणार करें बळें ।
सुकृत सर्व तुझेंच सदा फळें ॥
करिं जरी तरवारहि मोडकी ।
तरिहि शेवट होइल गोड कीं ॥ ३३ ॥

श्लोक [ शार्दूलविक्रीडित. ]

सोडोनी निघतां तुला खळखळा त्वां ढाळिलीं आसवें ।
वाटे कां नच आणिली तुजशि मी तेव्हांच माझ्यासवें ॥
कंठाया परदेश त्वत्तनु सखे वाटे मला कोमला ।
आलों ह्यास्तव सोडुनि तुज परी ता खेद होतो मला ॥३४॥

---

१ कंबर बांधून. २ तुंबळयुद्धाला. ३ पर्वा. ४ अभ्यास, सराव. ५ हवी तशी. ६ रंजक, भडिमार. ७ ह्या तुझ्या प्रिय मनुष्याला.

श्लोक [ स्रग्धरा. ]

येथें प्रत्येक वस्तू बघुनि पटतसे नित्य चित्तास बोध ।
कानीं येती अहाहा! हरघडिस किती कल्पनातीत[१] शोध ॥
उद्योगाचा यशाचा झडुनि चवघडा थोर साम्राज्य चाले ।
आत्मोन्नत्ति-प्रकाशें सुमति उजळते राहतां अल्प काळें ॥३५
वाटे हा देश नोहे अनुपम विधिनें निर्मिला स्वर्ग अन्य ।
पाहोनी काय सांगूं प्रियतम सखये! जाहलों धन्य धन्य ॥
शिष्टाचारांत ह्यांची बहुत सुजनता व्यक्त होय स्वभावें ।
नाहीं उद्दामवृत्ती मृदु मधुर सदा बोलती नम्रभावें ॥३६॥

श्लोक [ पृथ्वीवृत्त. ]

गमे प्रथम दर्शनीं फरक तो मला आयका ।
हुषार शिकल्या बहू चतुर शाहण्या बायका ॥
न त्या धरिति फारशी निज मनीं पतीची क्षिती ।
स्वयेंच उपजीविका करुनि बालकां रक्षिती ॥ ३७ ॥

श्लोक [ भुजंगप्रयात. ]

स्त्रियांची स्थिती आपुल्या फार खोटी ।
तया पाहुनी येतसे कींव पोटीं ॥
खरांही बरा त्यापुढें बंदिवान ।
कराया वरी पात्रताही न मान ॥ ३८ ॥

श्लोक [ स्रग्धरा. ]

दुर्दैवानें तयांना बहुविध मिळती सासवाही कजागें[२] ।
ताडोनी निंद्य शब्दें छळुनि करुनिया राग देतात डाग ॥
घोडीही काय थोडी बळकट म्हणुनि मीठही तोडतातें[३] ।
केव्हां पाठींत काठी पतिहि लहरिनें लांकडें मोडतात ॥३९॥

---

१ कल्पनेच्या बाहेरचे. २ खाष्ट. ३ नवऱ्यापेक्षां बायको मोठीशी वाटली तर तिला मीठच खावयास देत नाहींत !

विद्या नाही अडाणी स्वहित न समजे बांधली जेवि गाय ।
चित्ताला धीर नाहीं चुकुनिहि न सुचे मुक्ततेचा उपाय ॥
ऐकेना बोल कोणी गरिब हळु हळु युक्त जें जें वदे ते ।
अंतीं सोसे न तेव्हां त्वरित नदिवरी जाउनी जीव देते ४०

श्लोक [ शार्दूलविक्रीडित. ]

येथें तों तसला प्रकार सखये स्वप्नांतही नाढळे ।
भर्त्याचा अधिकार काय अपुला साऱ्या स्त्रियांना कळे ॥
तेणें त्या पतिनिष्ठ नाहिंत असें भासे मनाला जरा ।
आहे भ्रामक पाहतां समज तो साराच नाहीं खरा ॥४१॥
ऐशी वस्तु नसे जगांत भरली जी सर्वही सद्गुणें ।
किंवा दोष जिच्यांत एकहि नसे कोठें न कांहीं उणें ॥
हाताचींच कशीं कमी अधिकही आहेत बोटें पहा ।
कांहीं व्यंग तसें असेल हिकडे आश्चर्य नाहीं महा ॥ ४२ ॥
न्हावी तांबट की सुतार गवळी चांभार धोबी गडी ।
व्यापारी जन कीं सदैव बसती घेवोनि जे तागडी ॥
प्रेमें वाचिति रोज रोज सगळे सद्वृत्तपत्रें किती ।
वाटाघाट जगामधील करिती ऐशी तया माहिती ॥ ४३ ॥
लोकांना अपुल्या हवेंत हिकडे वाटे बहू गारवा ।
सुस्तीचा करि होम[1] जोम चढवी कामें कराया नवा ॥
होतां रोज दुपार तेथें[2] डुलकी घ्यावीच वाटे मना ।
निद्रेची दिवसा कधींच इकडे होई न कीं वासना ॥ ४४ ॥

श्लोक [ स्त्रग्धरा. ]

उद्योगीं मग्न सारे नियमित गतिनें चालती सर्व कामें ।
जो तो घाईत जाई पळभर न दिसे एक कोणी रिकामें ॥
कोणी केव्हांहि येथें क्षणहि न दवडी वेळ हा व्यर्थ ऐसा ।
बाल्यापासूनि सारे समजुन असती वेळ प्रत्यक्ष पैसा[3] ॥४५॥

---

१ सुस्तीचा नाश करून. २ तेथें—हिंदुस्थानांत. ३ वेळ हाच पैसा आहे. 'Time is money' ही ह्मण येथें प्रचारांतच आहे.

श्लोक [मंदाक्रांता.]

कोठेंही जा नियमितपणा हा पुढें मूर्तिमंत ।
कोण्या काळीं मिनिट चुकतां वाटते त्यांस खंत[1] ॥
होवो मोठी जनहितसभा कीं असो मेजवानी ।
वेळेआधीं जमति सगळे मागुनी मानहानी ॥ ४६ ॥

श्लोक [स्रग्धरा.]

उद्योग ज्ञान दोन्हीं तरुवर फुलले हे खरे कल्पवृक्ष ।
सच्छद्धाचे मनोरे इतर विषय ते मानिती सर्व रुक्ष ॥
बुद्धिज्ञानें विचारें निशिदिनिं खपुनी लाविती शोध नाना ।
संपत्तीचा सुखाचा सरलतर असा मार्ग देती जनांना॥४७॥

मांसावांचून येथें प्रकृति बिघडते बोलणें हेंहि वाया ।
ज्याला जें जें नको तें जुलुम करुनियां घालितो कोण खाया ।
शाकाहारीहि येथें कितितरि असती चांगले धष्ट पुष्ट ।
हिंदूंना मात्र होतें मधुसें[2] न शिवतां काय मोठें अनिष्ट ॥४८॥

अन्य द्वीपांतरीं जा स्थितिरिति तरिही वाटती भिन्न भिन्न ।
त्यासाठीं अन्य लाभ त्यजुनि परततां होउनी फार खिन्न॥
अभ्यासानें परी त्या पुढति हळु हळू सर्व होतील गोड ।
मातें हा देश सारा ह्मणुनि गमतसे लाभली दिव्य[3] जोड ४९

मी तों युद्धांत आहे तरि नगर फिराया रात्रिचा फार जागे ।
मध्यें ईशप्रसादें मजशि मिळतसे थोडथोडी रजा गे ॥
पाहोनी राहुनीया परिचय करतों येथच्या ह्या जनातें ।
त्यांच्याशीं फार भाग्यें खचित मज गमे जोडलें आज नातें ५०

श्लोक [मंदाक्रांता.]

गप्पा सप्पा हलकट पदें लोकनिंदा टवाळी ।
कोणाच्याही वदनिं न निघे एक बीभत्स गाळी ॥

---

१ दुःख. २ मद्यमांसाला शिवल्याशिवाय. ३ अलभ्य लाभ.

तोंडीं येतीं विषय तरि ते सर्व लोकोपयोगी ।
त्याचे देश प्रतिफल पहा स्वर्गिंचे भोग भोगी ॥ ५१ ॥

श्लोक [ शार्दूलविक्रीडित. ]

येथें तों सगळ्या स्त्रियांस सखये स्वातंत्र्य आहे भलें ।
तें कांहीं पुरुषांस नीट न दिसे नेत्रांत भारी सलें[१] ॥
जातांना बटकी धनी चरफडे कुंथे विनाकारण ।
कोठें स्वार्थ कधीं कुणास सुटला हें सर्वसाधारण ॥ ५२ ॥
विद्याभ्यास करोनि सर्व युवती आहेत येथें सुखी ।
सासूच्या पतिच्या बळी न पडती क्रोधानळाच्या मुखीं ॥
ज्या पायावरती स्वयेंचि अपुल्या वेळीं उभ्या राहती ।
नारी संकटयुक्त मुक्त करण्या सर्वस्वही[२] वाहती ॥ ५३ ॥
कोठें दुर्बळ दीन हीन अमुच्या निस्तेज त्या कामिनी[३] ।
कोठें येथिल ह्या हुषार चपला प्रत्यक्ष सौदामिनी[४] ॥
ज्यांना पाहुनि भीतिनें दशदिशा गेली तमोयामिनी[५] ।
तेजें बुद्धिबळें सदा विलसती जैशा जगत्स्वामिनी[६] ॥ ५४ ॥

श्लोक [ स्रग्धरा. ]

व्हायाला वीरमाता खचित उचित त्या कीं खऱ्या वीरपत्नी ।
तैशी होई प्रिये तूं भगिनिसह तुझ्या लौकरी दीर्घयत्नीं ॥
पोटीं ऐशा स्त्रियांच्या निघुनि नरमणी सर्व होतील धन्य ।
ह्याहूनी कोणतें तें वद वद उरलें जन्मसाफल्य अन्य ५५
पेटेना चूल येथें घरिं घरिं कधिंही नित्य खाणावळीचीं[७] ।
ताटें वाढूनि येतीं घडिं घडि मिळते बातमीही कळीची[८] ॥

---

१ खुपतें. २ सर्वस्व अर्पण करतात. आनिबिझांट, लेडी ब्लाव्हाटस्की, लेडी डफ्रीन वगैरे परोपकारी स्त्रियांचीं उदाहरणें पहावीत. ३ स्त्रिया. ४ विजा. ५ अज्ञानरूप रात्र, अंधारी रात्र. ६ जगावर अंमल चालविण्यास योग्य. ७ युरोपांतील व अमेरिकेंतील मोठमोठ्या शहरांतून प्रत्येक घरीं मुळींच स्वयंपाक करीत नाहींत. प्रत्येक आळीला एक एक मोठी खाणावळ असते. तेथून पाहिजे तेव्हां ऊन ऊन ताटें, चहा, काफी सर्व कांहीं ताबडतोब येऊन पोंचतें. बातमी पोचविण्याकारितां प्रत्येक मजल्यावर ज्याच्या त्याच्यापाशीं तार असते. चहा, काफीसुद्धां तारेला बांधूनच कप आपोआप येतात, व आपोआप परत जात असतात. हिशेबाप्रमाणें प्रत्येक आठवड्याला बिल येतें, व तें घरीं होणाऱ्या खर्चापेक्षां पुष्कळ कमी असतें. ८ कळीची बातमी—तारबातमी.

त्यायोगें खर्च येतो किति तरि कमती कल्पनाही न आम्हां।
वांचोनी वेळ सारा हरघडि मिळतो बायकांना रिकामा ५६

श्लोक [भुजंगप्रयात.]

स्वयंपाक तो होतसे फार दूर ।
घरीं त्यामुळें होत नाहींच धूर ॥
न होतीं कधीं कापडें सर्व काळीं ।
न वाढे अढ्याकोपऱ्यामाजि जाळी ॥ ५७ ॥

श्लोक [मंदाक्रांता.]

तेथें येती अवचित निशीं पाहुणे पांच चार ।
स्नेही कैसा करिल शहरीं हा न चित्तीं विचार ॥
धोत्रें घाला धुउनि जरि ते मोठमोठे तरूण ।
द्यावें लागे पसरुनि तयां आपुलें आंथरूण ॥ ५८ ॥

श्लोक [भुजंगप्रयात.]

अतीथीप्रती कोण होई न राजी ।
घरीं येउं दे खाउं दे भात भाजी ॥
नसे फारशी खर्च ही बाब वाटे ।
स्त्रियांचे ढिले मात्र होतात कांटे ॥ ५९ ॥

श्लोक [मंदाक्रांता.[

कोणी बोले निरशन मला आज आहे उपास ।
कोणी बोले कडवट असा वास येतो तुपास ॥
कोणी लोणी कढवुन म्हणे तूप साजूक वाढा ।
कोणी बोले शिजवुनि मला पाहिजे रोज काढा ॥६०॥

श्लोक [शार्दूलविक्रीडित.]

कोणा आंबट ताक शाक बरवी कोणास ताजीं भजीं ।
कोणी पथ्य म्हणून पान भरलें टाकून देई अजी ॥
कोणाला खरपूस भाकर हवी कोणास पोळी मऊ ।
खस्ता यापरि काढतां युवतिच्या नाकास येती नऊ ॥६१॥

जिव्हेचे करिती असे परगृहीं नानापरी सोहळे ।
येती ते जणुं काय अन्य सदनीं लागूनिया डोहळे ॥
ओढोनी चिलमी जमे उकिरडा रंगें बरें आंगण !
जोडावे कर पाहुण्यांस असल्या घालोनि लोटांगण ॥६२॥

श्लोक [ स्रग्धरा. ]

ह्या तों देशांत ऐसा अवचित न कधीं पाहुणा ये घराशीं ।
आधीं सांगून त्याला तपशिल अवघा मागवी उत्तराशीं ॥
मी तों राहीन येथें अमुक दिवस मी पाहिजे इष्ट सोय ।
जाई आल्यास तेथें नियमित समयीं उत्तरामाजि 'होय' ६३

श्लोक [ शार्दूलविक्रीडित ]

येथें एक न दोन पुष्कळ अशा चालीरिती पाहतां ।
सारा त्रास चुके मनोरथ पिके त्यांच्यासवें राहतां ॥
ऐशा कैक रिती कृती जनहितीं नाहीं तयांना मिती ।
त्या त्या मी तुजला लिहून कळवूं पत्रांत एका किती ६४
सौख्याचीं असलीं अखंड हिकडे लक्षावधीं साधनें ।
तीं तीं पाहुनिया उमेद चढते सोल्हास होतीं मनें ॥
येथें आळस हा बियास न मिळे निंदा न कोठें पिके ।
अन्याशीं विनयें वदेल जन तो कांहीं न कांहीं शिके ॥६५॥
हा तो देश मला पसंत पडला मच्चित्त येथें जडे ।
ह्याच्याशीं समतोल देश अपुला होईल केव्हां गडे ॥
भाग्याचे पुतळेच जे जन अशा देशामधें राहती ।
दुर्दैवी, अवलक्षणी न नयनीं हा देश जे पाहती ॥६६॥

श्लोक [ वसंततिलका. ]

आतां असो सकल हें स्थिर ठेव चित्त ।
आनंददायक असें परिसें सुवृत्त ॥
व्हिक्टोरिया पदक[१] आज मिळे मला गे ।
मन्मित्रमण्डळ जयस्तवनास लागे ॥ ६७ ॥

---

१ लष्करामध्यें पराक्रम करण्यास हें सुवर्णपदक देऊन त्याचा सन्मान करतात.

एकत्र सर्व जमुनी अजि हे वरिष्ठ।
माझें प्रभूजवळ चिंतिति कीं अभीष्ट॥
माझा पराक्रम सखे बहु अल्प पाही।
शाबास सर्व म्हणती प्रभुची कृपा ही॥ ६८॥
झाला पगार चढुनी मज दोनशें गे।
वाढेल ह्याहुनि पुढें म्हणतात वेगें॥
आतां प्रिये जिवलगे तुजला कमी न।
मी दीन हा तुजविणें जलहीन मीन॥ ६९॥

श्लोक [मंदाक्रांता.]

माझीही तों मुदत भरली राहिले दोन मास।
येवोनीया तुजशि सखये! शीघ्र भेटेन खास॥
आनंदानें अनुपम बरें पर्व तें प्राप्त व्हावें।
देवाजीनें तुजशि मजशीं दीर्घ आयुष्य द्यावें॥ ७०॥

श्लोक [शार्दूलविक्रीडित.]

आतां पत्र पुरे परेड चुकतां होईल मातें सजा।
तूंही दुःख करूं नकोस ह्मणुनी घेतों तुझी मी रजा॥
ऐकोनी अपुल्या स्वदेशभगिनी होवोत साऱ्या सुखी।
ह्यासाठीं तुजला लिहीन दुसऱ्या पत्रांत मी आणखी॥७१॥

श्लोक [इंद्रवज्रा.]

वाचूनिया हें मम पत्र नीट।
होई जगामाजीं सदैव धीट॥
निष्ठा धरी तूं परमेश्वराची।
मी वाट पाहें तव उत्तराची॥ ७२॥

## पहिलें पत्र समाप्त.

१६५५

REFBK-0001457

REFBK-0001457